मुख्य अभियंता (पथ)कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.: ७०६८
दिनांक: ०८/०८/१९

# -: निमंत्रण :-

**विषय :- १५ ऑगस्ट २०१९ ,७२ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त**
**स्वच्छ भारत मिशन २०२० स्वच्छ पुणे सुंदर पुणे**
**सायकल रॅलीस उपस्थित राहणेबाबत.**

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त ठ.क्र. ६/१७७ दि.२/७/२०१९.

पुणे महानगरपालिकेच्या सायकल विभागाच्या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी /कर्मचा-यांनी सायकल क्लब स्थापन केला असून पुणे महानगरपालिकेच्या सायकल विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी स्वयंप्रेरणेने काम करण्याची तयारी दर्शविली असून त्यासाठी पुणे महानगरपालिका सायकल क्लबने प्रस्तावित केलेल्या उपक्रमांना मा.महापालिका आयुक्त यांनी मा.महापालिका आयुक्त ठ.क्र. ६/१७७ दि.२/७/२०१९ अन्वये मान्यता दिली आहे.

पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या वतीने सायकल रॅलीच्या माध्यमातून स्वयंस्फूर्तीने पर्यावरण,ध्वनी प्रदुर्षण,आरोग्य,इ.विषयांबाबत मोठया प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच इतर दिवशी व शासकीय सुटट्रींचे दिवशी पुणे शहरात व पुणे शहराबाहेर लघु पल्ल्याच्या व दिर्घ पल्ल्याच्या विविध संदेश घेऊन,लघुकालीन व दिर्घकालीन सायकल रॅलींचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच सायकलिंग संबंधीत विविध प्रशिक्षण, व्याख्याने, इ.चे आयोजन करण्यात येणार आहे, असे स्वयंनियोजनाने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

सदर पुणे महानगरपालिका सायकल क्लबमध्ये इच्छूक आजी ,माजी पदाधिकारी,अधिकारी,सेवकांना समाविष्ट करून घेण्यात येत आहे.

पुणे महानगरपालिका सायकल क्लबचे वतीने स्वातंत्र्यदिन सायकल रॅलीचे आयोजन गुरूवार दिनांक१५ ऑगस्ट २०१९ रोजी सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत केले आहे. सदर रॅलीची सुरूवात पुणे महानगरपालिका मुख्य भवन येथून सकाळी ८.३० वा. होणार असून सदर रॅलीचे फ्लॅगऑफ मा.महापौर,मुक्ताताई टिळक यांचे हस्ते होणार असून कार्यक्रमासाठी मा.सौरभ राव,महापालिका आयुक्त,मा.डॉ.विपिन शर्मा,अतिरिक्त महापालिका आयुक्त,मा.रूबल अग्रवाल,अतिरिक्त महापालिका आयुक्त,मा.शान्तनू गोयल,अतिरिक्त महापालिका आयुक्त तसेच मा. पदाधिकारी,अधिकारी उपस्थित राहणार असून आपण या कार्यक्रमास उपस्थित राहून सायकलवीरांना प्रोत्साहित करावे ,अशी विनंती आहे.

मा.स.कळावे.

(नरेंद्र साळुंके)
अधिक्षक अभियंता(सायकल विभाग)
पुणे महानगरपालिका.

प्रत :
मा.महापौर,
मा.उप महापौर
मा.अध्यक्ष स्थायी समिती,
मा.सभागृह नेते,
मा.विरोधी पक्षनेते,
सर्व पदाधिकारी,
सर्व मा.गटनेते,
सर्व मा. सभासद,पुणे महानगरपालिका.
मा.महापालिका आयुक्त
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(जनरल/विशेष/इस्टेट)
सर्व मा. खातेप्रमुख
सर्व सह आयुक्त
सर्व उप आयुक्त (परिमंडळ १ ते ५)
सर्व महापालिका सहा.आयुक्त(क्षेत्रिय कार्यालये)
सर्व विभागप्रमुख.
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस सस्नेह सादर..